यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_prtrndc@ycmou.ac.in दूरध्वनी Telephone : (0253) 2230191

प्रा. राम ताकवले संशोधन केंद्र / Prof. Ram Takwale Research Centre

# व्याख्यानाचा सविस्तर अहवाल

**विषय :** How to get Research Funding from Various Funding Agencies

**ठिकाण :** Academic Hall, **शैक्षणिक इमारत**

**तारीख :** दि. १८ एप्रिल २०२४ **वेळ : सकाळी ११:०० ते दुपारी ०१:३०**

संशोधन कार्याविषयी निष्ठा व आवड असणारे आपल्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे सन्माननीय कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे सर यांनी आपल्या विद्यापीठात कुलगुरू पदाची जबाबदारी स्वीकारल्यापासून विद्यापीठात संशोधन कार्य जोमाने करण्यावर भर दिला आहे. त्याचाच एक भाग म्हणून सरांनी दि. ०१ ऑगस्ट २०२३ रोजी आपल्या विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू कै. प्रा. राम ताकवले सर यांच्या नावाने प्रा. राम ताकवले संशोधन केंद्राची स्थापना केली आहे व या केंद्राच्या माध्यमातून संशोधन कार्याला प्रोत्साहन देणे, संशोधन कार्यासाठी अनुदान देणे, संशोधन कार्यासंदर्भातील नवीन शिक्षणक्रम विकसित करणे, संशोधनासाठी मार्गदर्शनपर Audio व Video विकसित करणे, Online Research Journal सुरु करणे, संशोधन मार्गदर्शनासाठी व्याख्यानांचे आयोजन करणे, असे उपक्रम राबविण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून दि. १८ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ११:०० ते दुपारी ०१:३० या वेळेत विद्यापीठातील सर्व प्राध्यापक व नवनियुक्त शैक्षणिक संयोजक यांच्यासाठी **"How to get Research Funding from various Funding Agencies"** या विषयावर उपयुक्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी प्रा. विश्वास गायकवाड सर (विभागीय संचालक, पुणे विभागीय केंद्र) हे तज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी विद्यापीठाचे मा. प्र. कुलगुरू डॉ. जोगेन्द्रसिंग बिसेन सर, कुलसचिव श्री. दिलीप भरड सर, प्रा. राम ताकवले संशोधन केंद्राच्या संचालक, इमरटस प्रो. कविता एस. साळुंके मॅडम तसेच विद्यापीठातील सर्व विद्याशाखा, विभाग व केंद्रांचे संचालक, प्राध्यापक वर्ग व नवनियुक्त शैक्षणिक संयोजक अशी एकूण ९४ जणांची उपस्थिती होती. **(परिशिष्ट ०३ - उपस्थितांची यादी)**

कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली. डॉ. वसुदेव व्ही. राऊत, शैक्षणिक संयोजक, प्रा. राम ताकवले संशोधन केंद्र यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रा. विश्वास गायकवाड सर यांचा परिचय उपस्थितांना करून दिला. त्यानंतर विद्यापीठाचे मा. प्र. कुलगुरू डॉ. जोगेन्द्रसिंग बिसेन सर व

मा. कुलगुरु कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत आवक क्र.: VC/4732
दि. 24/ 4 /2024

प्रा. राम ताकवले संशोधन केंद्राच्या संचालक, इमरटस प्रो. कविता एस. साळुंके मॅडम यांच्या हस्ते तज्ञ मार्गदर्शक प्रा. विश्वास गायकवाड सर (विभागीय संचालक, पुणे विभागीय केंद्र) यांचे शाल व सन्मानचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. राम ताकवले संशोधन केंद्राच्या संचालक, इमरटस प्रो. कविता एस. साळुंके मॅडम यांनी केले. यामध्ये प्रा. राम ताकवले संशोधन केंद्राची कार्यप्रणाली, राबवत असलेले उपक्रम, संशोधनविषयक धोरणे व भविष्यातील कार्ययोजना यांची माहिती दिली.

त्यानंतर प्रा. विश्वास गायकवाड सर यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानास सुरुवात झाली. सरांच्या व्याख्यानातील महत्वपूर्ण आशय व मुद्दे पुढीलप्रमाणे :

१. प्रा. विश्वास गायकवाड सर यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० संदर्भात खालील प्रमाणे मार्गदशन केले.
   - नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० व उच्च शिक्षणात होऊ घातलेले भविष्यकालीन बदल,
   - पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या स्वरुपात व कालावधीत होणारे बदल,
   - त्यानुषंगाने संशोधन कार्यावर देण्यात येणारा जास्तीत जास्त भर,
   - CBCS Pattern,
   - Dicipline Migration,
   - Choice of Courses,
   - Multiple Entry / Exit Points,
   - Multi and Interdisciplinary Approach,
   - Flexible Modes of Learning,
   - Multi-Institutional Learning,
   - Lateral Entry,
   - Diciplinary Approach,
   - Multi-disciplinary,
   - Inter diciplinary Approach,
   - Trans-diciplinary Approach,
   - Restructuring of Apex Bodies in Higher Education System,
   - Changes in Higher Education System

२. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार संशोधन कार्याचे स्वरूप व रूपरेषा कशी असेल, यासंदर्भात पुढील मुद्दे मांडले.
   - नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार संस्थांच्या गरजानुसार संशोधन धोरण तयार करणे,
   - इतर शैक्षणिक संस्था व उद्योग समूह यांच्या सहयोगाने संशोधन धोरण तयार करणे,
   - संशोधन उपक्रमांसाठी सुलभ आणि व्यापक प्रशासन व्यवस्था निर्माण करणे,

- संशोधनाला चालना देण्यासाठी आणि पूरक तंत्रज्ञान विकसित करणे,
- भारतीय ज्ञान प्रणालीचा वैज्ञानिक दृष्टीकोनातून अभ्यास करणे,

३. NEP 2020 मधील Section 17.1 नुसार संशोधन कार्यातून Knowledge Creation, Fundamental Contributions, Vibrant Economy, Uplifting Society, Prosperous Civilization हे उद्देश साध्य होणे गरजेचे असल्याचे सांगितले. तसेच Section 17.2 नुसार A robust ecosystem for boosting the research in country, Creation of resources and expansion of Research capabilities across the nation, Research in emerging technologies in realm of rise of Artificial Intelligence and Machine Learning, Envisioning India as a Global leader in Research and making India a leading knowledge Society, Special attention to global issues such as climate change, population dynamics and management या मुद्यांद्वारे संशोधनाची कल्पना मांडली.

४. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार विद्यापीठांमध्ये संशोधनाची संस्कृती रुजवणे व संशोधन निधीच्या विश्वासार्ह आधार प्रदान प्रक्रियेसाठी हे National Research Forum (NRF) स्थापना केली आहे. संशोधन प्रकल्पांना मंजुरी व अनुदान देणे, संशोधन प्रकल्पांचे नियंत्रण करणे, संशोधन कार्याला उद्योगांशी जोडणे, उत्कृष्ट संशोधन कार्यांची ओळख आणि त्याच्या प्रगतीचा आढावा घेणे ही NRF ची महत्वपूर्ण कार्ये आहेत.

५. संशोधन विषय कसा निवडावा? यामध्ये वर्तमानकालीन व भविष्यकालीन गरजा व आवश्यक घटक यावर आधारित संशोधन विषय असावेत, अनुदान प्राप्तीसाठी गुणवत्तापूर्ण संशोधन प्रस्ताव तयार करणे, आपल्या वरिष्ठांकडून संशोधन प्रस्ताव तपासून घेणे, इ. बाबीवर मार्गदर्शन केले.

६. संशोधन आराखड्याचे खालील घटकांसंदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले.
   - Research Grants
   - Grant Schemes
   - Grant Applications
   - Theme of Grant Proposal
   - Selection Process

७. संशोधन आराखड्याची निर्मिती करताना दीर्घकालीन उद्दिष्ट्ये, उपलब्ध संसाधने, समावेशक धोरण, संशोधन अनुदान देणाऱ्या योग्य संस्थांचा शोध, उपलब्ध संधी या बाबींचा अभ्यास करण्यात यावा.

८. संशोधन आराखडा करताना सर्वेक्षण, अनुदान देणाऱ्या संस्थांची अनुदान क्षेत्रे, पूर्व दस्तावेजीकरण, विद्यापीठ अधिकार मंडळांकडून मान्यता प्राप्त करणे, आराखड्याचे लेखन अशा क्रमाने कार्य करावे.

९. संशोधन अनुदानासाठी अर्ज करण्यापूर्वी सद्यस्थितीतील विषय, सद्यस्थितीतील मर्यादा व बंधने, मागील काळात संशोधन अनुदान प्राप्त झालेले विषय, अनुदान देणाऱ्या संस्थांची भविष्यकालीन धोरणे, अनुदान देणाऱ्या संस्थांची पुनरावलोकन प्रक्रिया यांचा अभ्यास करावा.

१०. संशोधन अनुदान प्रस्तावातील मुख्य घटक पुढीलप्रमाणे :

- Statement of Proposal,
- Methods & Techniques,
- Applications & Outputs,
- Future Prospects

११. संशोधन अनुदान प्रस्तावातील क्रं Title Page, Summary / Abstract, Background and Introduction, Goals and Objectives, Plan of Work and Outline, Research Methodology, Budget, Application, References, Appendices असा असणे आवश्यक आहे.

१२. संशोधन अनुदान प्रस्तावाचे शीर्षक स्पष्ट व मोजक्या शब्दांत असावे.

१३. उद्दिष्ट्ये स्पष्ट व मापनीय असावीत.

१४. कामाचे पूर्वनियोजन व आराखडा तयार करावा.

१५. संशोधन पद्धती निवडताना Working Hypotheses, Institutional Approval, Research Design, Sampling Plan, Variables, Data Collection, Statistical Considerations, Probable Limitations and Alternate Methods यांचा काळजीपूर्वक विचार करावा.

१६. संशोधन अनुदान प्रस्तावामध्ये खर्चाचे वाढीव अंदाजपत्रक नमूद करावे.

१७. संदर्भ लेखन करताना विविध विद्याशाखांसाठी प्रमाणित केलेल्या संदर्भ लेखन पद्धतींचा अवलंब करावा. उदा. : APA, MLA, Vancouver, Harvard, IEEE, MHRA, OSCOLA

१८. परिशिष्टांमध्ये Brief biodata P.I. and Co-P.I., Reprints of Publications /Patents, Equipment's (Available and required), No objection certificate / Endorsement of host organization / Govt. bodies, IAEC /CPCSEA clearance, इत्यादींचा समावेश असावा. यासोबतच Resolutions, Risk Assessment, Collaborations & partnerships, Letters of support, Appendixes, research & data, other IRS documents यांचा समावेश असावा.

१९. संशोधन प्रकल्पांची निवड करताना Objectives, Research Problem, Significance of the Research, Output, Applications, Role of Funding Agency या बाबींवर भर दिला जातो.

२०. संशोधन प्रकल्प निवडीच्या दुय्यम निकषांमध्ये Research Profile of principal investigator, Emerging Research Topics, Strong Base, Available Resource, Industry-Connect यांचा समावेश होतो.

२१. Research Funding करणाऱ्या Govt. Agencies & Non Govt. Funding agencies असे दोन प्रकार आहेत.

२२. राष्ट्रीय स्तरावरील संशोधन अनुदान देणाऱ्या संस्था पुढीलप्रमाणे-

- All India Council for Technical Education
- Council of Scientific and Industrial Research

- Department of Atomic Energy
- National Board for Higher Mathematics
- Department of Electronics
- Defense Research and Development Organization
- Aeronautics Research and Development Board
- Defense Metallurgical Research Laboratory
- Life Sciences Research Board
- Department for Scientific and Industrial Research
- Department of Science and Technology
- Indian Council of Medical Research
- Indira Gandhi Centre for Atomic Research
- Indian National Science Academy
- Indian Renewable Energy Development Agency Limited
- Indian Space Research Organization
- Indian Society For Technical Education
- The Institution of Engineers (India)
- The Institution of Engineering and Technology
- India Meteorological Department
- Ministry of Communications and Information Technology
- Ministry of New and Renewable Energy
- Ministry of Environment and Forests
- Ministry of Earth Science
- Ministry of Water Resources
- Ministry of Communications & Information Technology
- Ministry of Food Processing Industries
- National Council for Economic Research and Training
- National Jute Board
- Petroleum Conservation Research Association
- Research Scheme on Flood Control
- Research Scheme on Power
- SAARC Documentation Centre
- Science and Engineering Research Council\
- Technology Absorption and Adaptation Scheme
- University Grants Commission

- Vikram Sarabhai Space Centre
- Waste to Energy

२३. आंतरराष्ट्रीय स्तरावरील TWAS ही प्रमुख संशोधन अनुदान देणारी संस्था आहे.

२४. UGC ने सद्यस्थितीत सुरु केलेल्या संशोधन छात्रवृत्ती खालीलप्रमाणे आहेत.

- Savitribai Jyotirao Phule Fellowship for Single Girl Child (SJSGC)
- Research Grant for In-Service Faculty Members
- Dr. D.S. Kothari Research Grant for Newly Recruited Faculty Members
- Dr. S. Radhakrishnan UGC Post-Doctoral Fellowship
- UGC Fellowship for Superannuated Faculty Members

२५. संशोधकांसाठी UGC च्या वैयक्तिक संशोधन छात्रवृत्ती खालीलप्रमाणे आहेत.

- Research Award
- Emeritus Fellowship
- Travel Grant Scheme for College Teachers/College Librarians
- Post Graduate Merit Scholarship Scheme For University Rank Holders In General & Honors Courses At Undergraduate Level
- Research Fellowship in Sciences for Meritorious Students.
- Dr. D.S. Kothari Post-Doctoral Fellowships in Sciences, Medical Sciences & Engineering Sciences.
- Dr. S. Radhakrishnan Post-Doctoral Fellowship (PDF) in Humanities and special Social Sciences(including language).
- Research Project for Teachers Major and Minor

२६. शैक्षणिक संस्थांसाठी UGC च्या अनुदान योजना खालीलप्रमाणे आहेत.

- Special Scheme of Construction of Women's Hostel for Colleges
- Faculty Development Program for Colleges to Organising Conferences/ Workshops/Seminars in colleges
- Development Assistance to colleges for the Construction of Buildings
- UGC-Network Resource Center (UGC-NRC) in the Colleges
- Instrumentation Maintenance Facility (IMF) in College
- Special Assistance Programme (SAP)
- College with Potential for Excellence
- University With Potential for Excellence

२७. National Women's Commission मार्फत महिला सक्षमीकरणासाठी कार्य करणाऱ्या संस्थांसाठी Women and Empowerment: Pay disparity in Organized and Unorganized sector, Reproductive Choice of Women, Women Led Enterprise and Challenges to

their scalability, Gender Inequality in Media and Entertainment या घटकांसाठी अनुक्रमे १९ लाख, १५ लाख व १३ लाख संशोधन अनुदान प्राप्त होते.

अशा रीतीने प्रा. विश्वास बी. गायकवाड सर यांनी संशोधन अनुदान देणाऱ्या विविध संस्था त्यांचे अनुदान निकष व अनुदानप्राप्तीसाठीची अर्ज प्रक्रिया याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ. जोगेन्द्रसिंग बिसेन सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले व संशोधकांनी संशोधन कार्यात नैतिकता पाळावी व गुणवत्तापूर्ण संशोधन करून अधिक संशोधन अनुदान प्राप्त करावे असे आवाहन केले.

व्यासपीठावरील सर्व मान्यवर, अतिथी व तज्ञ मार्गदर्शक प्रा. विश्वास गायकवाड सर व व्यासपीठासमोर स्थानापन्न झालेले सर्व विद्याशाखांचे संचालक, इतर मान्यवर आणि सहभागी शैक्षणिक संयोजक यांचे प्रा. राम ताकवले संशोधन केंद्राच्या वतीने आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. राम ताकवले संशोधन केंद्रातील शैक्षणिक संयोजक डॉ. वसुदेव व्ही. राऊत यांनी केले.

**इमरटस प्रोफेसर कविता साळुंके**
संचालक, स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंग आणि
प्रा. राम ताकवले संशोधन केंद्र

सोबत :

१. कार्यक्रमाचे परिपत्रक,
२. कार्यक्रमाचे बॅनर,
३. उपस्थितांची यादी,
४. फोटो

Good Initiative

मा. कुलगुरु